# प्रकरण- पहिले

## " निबंधाच्या संकल्पनेचे स्वरूप / उत्पत्ती "

# प्रकरण - पहिले

## " निबंधाच्या संकल्पनेचे स्वरुप / उत्पत्ती "

एकोणिसावे शतक हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक पुर्नघटनेचे शतक आहे. या शतकात महाराष्ट्र संस्कृती आणि मराठी वाङ:मय यामध्ये फार मोठया प्रमाणात बदल घडून आला. किंबहुना इहवादी दृष्टिकोनातून " निबंध " हा वाङ्:मयप्रकार मराठी वाङ:मयाला मिळालेली फार मोठी देणगीच आहे असे म्हणावे लागेल. जीवन विषयक नव्या जाणीवा, इहवादी दृष्टिकोनातून समाजाच्या तळागाळापर्यंत पोहचविण्याचे एक महत्वाचे साधन म्हणजे मराठी निबंध होय. आणि हे कार्य मराठी निबंध या वाङ:मयप्रकाराने केले असेच म्हणावे लागेल. चिपळूणकरांनी आपल्या निबंधाच्या माध्यमाद्वारे मराठी वाङ:मयात एक नवे पर्वच निर्माण केले. परंतु चिपळूणकरपूर्व निबंधाचे स्वरुपही तितकेच महत्वाचे व अभ्यासनिय आहे. विष्णूशास्त्री चिपळूणकरांच्या पूर्वी कृष्णशास्त्री चिपळूणकर, बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग तर्खडकर, भाऊ महाजन, लोकहितवादी, बाबा पद्मनजी, का.बा.मराठे यांनी महत्व-पूर्ण कामगिरी केली आहे. मराठी माणसांच्या मनाची व वैचारिकतेची मशागतच वरील निबंधकारांनी केलेली आहे. म्हणून चिपळूणकरपूर्व निबंधाचे स्वरुप काय होते ? याचा चिकित्सक अभ्यास करणे आवश्यक ठरते.

पिठयानपिठया शिक्षणापासून वंचित असलेल्या अशिक्षित समाजातील माणसांच्या मनाची व विचारांची पुर्नबांधनी या निबंध वाङ्:मयप्रकाराने केली. इंग्रजी वाङ:मयाच्या कालखंडात इंग्रजीतील अगाध ज्ञानाचे भांडार पाहून आपल्याकडील विचारवंत थक्क झाले आणि त्या ज्ञानाचा परिचय आपणालाही व्हावा असे वाटणे स्वाभाविकच होते. आणि येथूनच ख-या अर्थाने मराठी माणसांच्या ज्ञानसंग्रहाला सुरवात झाली. या कालखंडात

इंग्रजी शिक्षणामुळे शहाणे झालेल्या विचारवंतानी आपल्या ज्ञानाचा समाजातील अशिक्षितांना उपयोग व्हावा या उदात्त हेतूने मिळविलेल्या ज्ञानाचा प्रसार करण्याच्या कार्याला सुरवात केली. " शहाणे करुन सोडावे सकळजन " या उक्तीप्रमाणे या कार्याचा पाया रचला गेला. याच कालखंडात मराठी साहित्यात अनेक वाङ्:मयप्रकाराचे प्रवाह येऊन मिळाले. इंग्रजीतील साहित्याची मराठीमध्ये भाषांतरे केली गेली. परंतु स्वतंत्र निर्मिती बाबा पद्मनजींच्या " यमुनापर्यटन " या कादंबरीचा अपवाद वगळता झाली असे म्हणता येणार नाही. ज्ञानप्रसार करणे हेच या भाषांतरीत व एकूणच अस्तित्वात असलेल्या वाङ:मयाचे प्रयोजन होते. असे जाणवते. अशा या कादंबरी, नाटक, कथा, निबंध या अनेक वाङ:मयप्रकारांच्या प्रवाहापैकी " निबंध " हा एक महत्वाचा वाङ:मयप्रकार आहे.

असा हा मराठी निबंध इंग्रजी वाङ:मयाची मराठी वाङ:मयाला मिळालेली अलौकिक देणगीच आहे. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील अनेक वाङ:मयप्रकारातील महत्वाचा असा " निबंध " हा प्रकार आहे. मराठी वाङ:मयनिर्मितीचा तो पायाच होता. इंग्रजी विद्येच्या अपूर्ण तेजाने भारावून गेलेल्या विचारवंताना स्वजनांचे अज्ञान पाहून त्यांना शहाणे करुन सोडण्याची तळमळ वाटू लागली. मराठी निबंधाची निर्मिती या समाजप्रबोधनासाठीच झाली. त्यामुळे त्याचे स्वरुप केवळ बोधपरच होते. किंबहूना सध्याच्या प्रगल्य अवस्थेतील निबंधापेक्षा प्राथमिक अवस्थेतील निबंध हा पूर्णत: वेगळ्या स्वरुपाचा व भिन्न होता. या निबंधकारांनी आपल्या निबंधातून सामाजिक, राजकीय, कौटुंबीक, विज्ञानविषयक अशा वेगवेगळ्या विषयावर लेख लिहिले. तेच पुढे लेख पुढे निबंध म्हणून प्रसिध्द झाले. त्यामुळे चिपळूणकरपूर्व निबंधाचे स्वरुप काय होते हे पाहणे अत्यंत महत्वाचे ठरते.

मराठी मध्ये यापूर्वी कोणी कांही लिहिलेच नाही अशा भावनेने प्रारंभीच्या निबंधकारांनी निबंधलेखन केले. या लेखनाची प्रगल्भ अशी जाणीव

अद्याप त्याच्यामध्ये आली नव्हती. त्यामुळे मिळालेल्या विषयावर लेखन करून ज्ञानप्रसार करणे हेच तात्कालीन निबंधाचे स्वरुप आहे. त्याच बरोबर कांही वैचारिक स्वरुपाचे लेखनही झालेले दिसते. रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, इत्यादी विषयावरील लेखन विचारप्रधान होते. तर काही निबंधकारांनी सामाजिक जीवनातील एखाद्या प्रश्न घेऊन त्यावर लेखन केले. १८३५ मध्ये मिसेस फरारांनी लिहिलेला " कुटुंबप्रवर्तननीति " किंवा " मद्यपान निषेधक बोध ", " सदाचार " यासारख्या निबंधाच्या मथळ्यावरही या निबंधाचे स्वरुप किंवा आशय लक्षात येतो. यामध्ये विशेष वाङ:मयीन गुण होते असे म्हणता येणार नाही. पण समाजपरिवर्तनाची तळमळ मात्र निश्चित होती. या बरोबरच प्रारंभी कांही प्रमाणात भाषांतरीत स्वरुपाचे निबंधही मराठी मध्ये आणले गेले. हे विषय मराठी माणसाला रुचतील, पचतील असेच साधे होते. अव्वल इंग्रजी कालखंडात मराठी समाजाची स्थिती वर्णन करताना द.वा.पोतदार म्हणतात, " स्वराज्याचा कारभार आटोपला होता, सरस्वतीही विमुख झाली होती, आणि राष्ट्राची वाचा बसली होती. अशा हातबल किंकर्तव्यमुठ मनाचे उद्गारही असेच असणार "[१] यावरुन तात्कालीन सामाजिक स्थितीची किंचित जाणीव होते. तरीही या कालखंडातील निबंध आज वाचू लागलो म्हणजे त्यांच्या वैचारिकतेची साक्ष पटते. "आत्ता नावलाची किड फार झाली आहे. लहान मुले देखील नावले लिहून पैसे मिळवतात."[२] हे का.बा.मराठे यांचे उद्गार मनोरंजकच वाटतात. अशा या निबंध वाङ:मयाचा विकास प्रामुख्याने नियतकालिकातून झालेला दिसून येतो. बाळशास्त्री जांभेकर, भाउ महाजन यांनी " दर्पण " या वृत्तपत्रातून व महाजनींनी " प्रभाकर " या मासिकातून आपले लेखन समाजापर्यंत पोहचविण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. या निबंधाचे निश्चित स्वरुप कसे होते ? त्या अनुरोधाने मराठी वाङ:मयाचे व भाषेचे स्वरुप कसे होते ? सामाजिक मुल्यांचा भाग त्यामध्ये काही होता कां ? व या सर्वातून मराठी साहित्याचा विकास कितपत झाला ? या प्रश्नांची उत्तरे शोधणे हे या

अभ्यासाचे महत्वाचे प्रयोजन आहे.

(अ) निबंध : उद्‌गम आणि विकास :

१८१८ साली पेशवाईचा अस्त झाला आणि हिंदुस्थानवर इंग्रज सरकारचे राज्य सुरु झाले. यामुळे मराठी वाङ्‌मयास एक प्रकारे जोराची चालना मिळाली. १८१८ पूर्वी बखर वाङ्‌मयाचा अपवाद वगळता गद्य वाङ्‌मय मराठीमध्ये फारसे उपलब्ध नव्हते. पेशवाईच्या अस्तानंतर इंग्रजांनी मराठी माणसांना शिक्षण देण्यासाठी शाळा सूरु केल्या. त्यामुळे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात मोठाच बदल घडून आला. याच कालखंडात कादंबरी, कथा, नाटक यासारखे वाङ्‌मयप्रकार उदयास आले. यापैकी निबंध हा एक वाङ्‌मयप्रकार आहे. असे असले तरी १८१८ ते १८८५ या अव्वल इंग्रजी कालखंडात १८३२ ते १८७४ हा कालखंड निबंध वाङ्‌मयाच्यादृष्टीने महत्वाचा आहे. कारण १८३२ मध्ये बाळशास्त्री जांभेकर यांनी " दर्पण " हे वृत्तपत्र काढले. त्यामध्ये स्फुट लेख व वाचकांची पत्रे असेच त्याचे स्वरुप होते. १८७४ मध्ये विष्णूशास्त्री चिपळूणकरांची " निबंधमाला " सुरु झाली व निबंध वाङ्‌मयाला एक वेगळे स्वरुप प्राप्त झाले. मराठी वाङ्‌मयाच्या दृष्टिने अव्वल इंग्रजी हे युग संतुष्टात आले व यापुढे नवीन युगाची सुरवात झाली.

या युगाचे काळाच्या दृष्टिने दोन भाग पडतात. १८३२ ते १८४९ हा पहिला भाग आणि १८५० ते १८७४ हा दुसरा भाग होय. पहिल्या भागात बाळशास्त्री जांभेकर, मिसेस फरार, लोकहितवादी हे निबंधकार येतात. या कालखंडात निबंध वाङ्‌मयाची स्पष्ट अशी जाणीव नव्हती. सुचेल त्या विषयावर रांगड्या भाषेत गद्य लेखन करणे हेच त्याचे स्वरुप होते. १८४९ साली मात्र " मराठी ज्ञानप्रसारक " मासिक उदयाला आले. आणि निबंध वाङ्‌मयाचा दुसरा टप्पा सुरु झाला. यामध्ये कृष्णशास्त्री चिपळूणकर, दादोबा पांडूरंग , बाबा पद्‌मनजी, विष्णू बुवा ब्रम्हचारी, का.बा.मराठे

या सारख्या वेगवेगळ्या निबंधकारांनी वेगवेगळ्या विषयावर निबंध लेखन केले. यावेळी निबंधकाची शैली व निवेदनपध्दती यामध्ये काही प्रमाणात सुसुत्रता आली होती.

(ब) निबंध म्हणजे काय ? :

निबंध ही संकल्पना प्राचीन मराठी मध्ये अस्तित्वात नव्हती. " निबंध " हा वाङ:मयप्रकार अर्वाचीन मराठी वाङ:मयाच्या कालखंडात अस्तित्वात आला. आणि तो ही इंग्रजी वाङ्:मयाच्या मदतीनेच इंग्रजी शिक्षणाचा प्रसार, मुद्रणकलेमुळे गद्याला मिळालेले महत्त्व, जनजागृतीसाठी उदयास आलेली वृत्तपत्रे व नियतकालिके यामध्येच मराठी निबंधाचा पहिला अंकुर पहावयास मिळतो. अशा या निबंध वाङ:मयाचा अभ्यास करण्यासाठी प्रथमत: निबंध म्हणजे काय ? याचा शोध घ्यावा लागेल.

" निबंध " ही संकल्पना मराठीमध्ये प्रथम संस्कृत साहित्यातून आली. निबंध नि + बंध = निबंध . एखादा मुद्दा, विचार किंवा प्रसंग सुसुत्रपणे मांडणे म्हणजे "निबंध" होय. ज्या लेखनात विषय एका विशिष्ट पध्दतीने घेतला आहे अशा स्वरुपाची रचना म्हणजे निबंध. असे म्हणता येईल. प्राचीन मराठी वाङ:मयात " निबंध " हा वाक्प्रयोग " शास्त्राधार देणे " या अर्थाने वापरला जात होता. असे तर्कशुध्द व बुध्दिला अव्हान करणारे लेखन म्हणजे निबंध असे म्हणता येईल. इंग्रजीतील " Essay " या शब्दाला पर्यायी शब्द म्हणून मराठी वाङ:मयात " निबंध " हा शब्द वापरला जातो.

निबंधाच्या स्वरुपाविषयी निश्चित अशी एकच एक व्याख्या करता येणार नाही. कारण निबंधाचे स्वरुप प्रत्येक लेखकानुसार बदलत असते. " व्यक्ती तितक्या प्रकृती " हाच न्याय या ठिकाणी लागू पडतो. इंग्रजी वाङ:मयाच्या मदतीने मराठीत निबंध हा वाङ्:मयप्रकार अस्तित्वात आला

त्या इंग्रजी वाङ्‌मयातही निबंधाची परिपूर्ण व्याख्या नाही. इंग्रजीतील बेकन, मिल, डॉ.जॉन्सन, यांनी निबंध म्हणजे " पांडित्यप्रचूर पद्धतीने लिहिलेल्या एखाद्या महत्त्वाच्या विषयावरील सांगोपांग मुद्देसुद लेख " [3] असे म्हटले आहे. बेकन याने आपली निबंधाबद्दलची भूमिका स्पष्ट करताना,

" Dispersed maditiation's set down significanty then curiously " [4]

असे म्हटले आहे. यामध्ये भारदस्त विषय, व ज्ञानप्रसाराची वृत्ती हीच निबंधाची प्रमुख लक्षणे सांगितली आहेत आणि वरील या निबंधकारांचाच मराठीतील " निबंध " या वाङ्‌मय प्रकारावर प्रभाव असलेला जाणवतो. ऑक्सफर्ड कोशामध्ये निबंधाच्या स्वरुपाविषयी -

" A compasition of moderate langth on any Particular subject or branch of a subject " [5]

अशा स्वरुपाचा उल्लेख सापडतो.

असे असले तरी १९ व्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये इंग्रजी वाङ्‌मयातील निबंधाची संकल्पना बदललेली दिसून येते. प्रिचार्ड या इंग्रजी अभ्यासकाने निबंधाविषयी - " A Mild discontent, a wistful longing for that which not, but which has been or might be, an fargmentary but alway's sincere, to express a Problem in terms of one's Presonality - There- are the true essentials of true essay " [6]

अशा प्रकारची भूमिका मांडली आहे. त्याचप्रमाणे आपल्या विवेचनामध्ये निबंधाच्या रचलेविषयी सांगताना निबंधकाचे बाहय स्वरुपहे आकर्षक असावे, ते छोटे असावे, उगाच पाल्हाळ लावलेला ■ नसावा, निबंधकाचा विषय मानवी ■ जीवनविषयक असावा, उगाच रुक्ष तात्त्विक कात्याकूट नसावा, त्याच्या शैलीतून लेखकाचे व्यक्तिमत्व प्रकट व्हावे, उगाच क्रमीक बोजडता नसावी. अशा स्वरुपाच्या प्राथमिक सुचनाही त्यांनी

केल्या आहेत• यावरून इंग्रजी निबंधाचे व मराठीतील प्रारंभीच्या निबंधाचे स्वरुप कसे होते ते समजू शकेल•

अलेक्झांडर मिस्थ यांनी " It is a work of art and must confine to artistic rules " [7] म्हणजेच स्मिथ यांनी निबंध ही एक ललितकला आहे अशी संज्ञा मांडली आहे• त्यामुळे कलेची सर्व बंधने, आकाराचे लघुत्व व रम्यत्व विषयाचे नावीन्य, मांडणीचे कौशल्य, व्यक्तित्व प्रकट करणारी भाषा शैली, या सारखी निबंधाची वैशिष्टये मान्य केली पाहिजेत• त्याचप्रमाणे इंग्रजी वाड:मयातील अधुनिक निबंधशास्त्रज्ञ " ऑर्ले वुइल्यास " यांच्या मते - " It is a most delightfully airy mould of thought, which admitis of every literary gruee and every high quality of seale" [8] विचारांची स्वैर व आनंददायक मांडणी, त्या विचारातील कला विलासाची शोभा, अल्प अवकाशातून व्यक्त होणारे मनाच्या विशालतेचे पडसाद या गोष्टींचा समावेश असणारा लेख म्हणजे निबंध होय• अशा प्रकारचे मत मांडले आहे• वुइल्यम्स यांनी भाषा, लेखकाच्या अंत:करणाचा स्पर्श व विषयाची कलात्मक मांडणी इ• संकल्पना डोळ्यासमोर ठेवल्या आहेत असे वाटते•

निबंध या संकल्पने विषयी इंग्रजी अभ्यासकांच्यामध्ये विविधता दिसते• याच इंग्रजी निबंधाचा मराठी निबंधावर परिणाम झाला आहे• इंग्रजीतील विविध निबंधकारांच्या मतांचा पडताळा घेतला असता निबंधीची सर्वसमावेशक अशी व्याख्या कोणीच केली नाही• वरील प्रत्येक निबंधकारांनी आपल्या दृष्टिकोनातून निबंधाचे स्वरुप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे•

## (क) मराठीतील " निबंध " हा शब्द :

इंग्रजी वाड:मयातील निबंध या संकल्पनेच्या व्याख्या पाहता एक गोष्ट जाणवते की, निबंधाची एकच एक व्याख्या नाही• किंवा निबंधाची परिपूर्ण व्याख्या केलेली नाही• मराठीतील निबंधा हा शब्द सर्वसाधारणत:

विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या " निबंधमाले " पासून रूढ झाला असावा. परंतु मराठीमध्ये त्याच्याही आगोदर कांहीकाळ निबंध ही संकल्पना मराठीमध्ये अस्तित्वात होती. १८५० मध्ये "ज्ञानप्रसारक" या मासिकात "निबंध" हा शब्द आढळतो. तसेच १८३२ मध्ये बाळशास्त्री जांभेकरांनी "दर्पण" हे वृत्तपत्र सूरु केले, मिसेस फरार यांनी आपल्या " कुटुंबप्रवर्तननीति" या पुस्तकास निबंध ही संकल्पना वापरली होती.

संस्कृत साहित्यात वैचारिक ग्रंथाना " प्रबंध " असा शब्द जरी वापरला गेला असला तरी कांही ठिकाणी " निबंधन्" हा ही शब्दप्रयोग वापरलेला आपणास दिसून येतो. बदिस्त स्वरुपात लिहिलेला लेख असा अर्थ आपणास यावरुन काढता येईल. " ज्ञानप्रसारक " या मासिकामध्ये निबंध या संकल्पनेची एक व्याख्या आढळते. " कोणताही विषय न्याय रुपाने उद्धाटणे आणि त्याचे यथाशक्ति जुळणी करुन जे वर्णन करणे तो निबंध होय."[१] यावरुन निबंध या संकल्पनेचे स्वरुप कांही प्रमाणात स्पष्ट होते. अशा या निबंधाची सर्वसाधारणत: खालीलप्रमाणे विभागणी किंवा प्रकार सांगता येतात. उपदेशपर निबंध, ज्ञानप्रसारक निबंध, मतप्रचारात्मक निबंध, वृत्तपत्रीय निबंध, व्यक्तिचित्रनात्मक निबंध, शब्दचित्र असलेला निबंध आणि लघुनिबंध.

(ड) <u>इंग्रजीतील " Essay " चे स्वरुप</u> :

मराठीतील निबंध इंग्रजी वाङ्:मयातून आला असला तरी तो इंग्रजीतील " Essay " ला तंतोतंत समानार्थी होता असे नाही.

The Oxford English Distionary मध्ये "Essay" ची व्याख्या खालील प्रमाणे केली आहे. " A composition of moderate length or any Particular subject, or branch of subject originally imiplying want of finish, ' an irreginally,

indigested Piece ' (J), but now said of a composition more or less eb aborate in style, though limited in rang " [10] एसे हा ज्ञानप्रदर्शनाचा मार्ग नव्हे, असे मानून वैचारिक, तार्किक, सप्रमाण लेखनाला " एसे " ही संज्ञा इंग्रजी वाङ:मयात देण्यात येत नाही·

या निबंधाची " A composition of moderate languth an any Particular subject " [11] अशी एक व्याख्या इंग्रजी वाङ:मयात केली जाते· तर जोन्सन सारख्या प्रख्यात विद्वानाने निबंधाची एक वेगळीच व्याख्या केली आहे· " A losse of mind an irregular undigested dieee not a ragular and composition"[12] ही व्याख्या मराठी निबंधाचे स्वरुप स्पष्ट करण्यास उपयुक्त ठरेल· मराठी निबंधाचे मुळ दोन प्रकारे मानले जाते· एक म्हणजे दिलेल्या विषयावर मुद्देसुद शालेय पातळीवर माहितीवजा लेखन करणे व दुसरा प्रकार म्हणजे सुशिक्षित लोकांना बहुश्रुत करण्यासाठी, प्रबोधन करण्यासाठी हा आहे· हा निबंध प्रारंभी नियतकालिकातून प्रसिध्द होत होता· केवळ माहिती देणे, ज्ञानप्रसार करणे, किंवा उपदेश करणे, असे सुरवातीच्या काळात निबंधाचे स्वरुप होते· पुढे हा वाङ:मयप्रकार विकास पावला· व्यक्तिचित्रनात्मक, वर्णनात्मक, टीकात्मक, कल्पनाप्रधान, वैज्ञानिक इ· अनेक वेगवेगळ्या प्रकारचे निबंध उदयास आले व निबंध हा वाङ:-मयप्रकार विकास पावला·

## (इ) मराठी निबंध लेखनामागील मुळ उद्देश :

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी हिंदुस्थानात ज्ञानप्रसाराच्या कार्याला सुरवात झाली· १८१० मध्ये मुद्रणकला आली· पाठ्यपुस्तकाची निर्मिती होउ लागली· समाजात वृत्तपत्र वाचण्यास गोडी निर्माण होउ लागली· मराठी गद्य प्रारंभी जरी भाषांतरीत स्वरुपाचे असले तरी वृत्तपत्राच्या मदतीने वर्णनात्मक, वैचारिक, कौटुंबिक, लेख लिहिले जाउ लागले·

अशा स्वरुपाच्या लेखांना निबंध म्हणावे कां ? हा एक महत्वाचा प्रश्न आहे. परंतु वैचारिक सामाजिक स्वरुपाचे लेखन करणे हेच मराठीचे प्रारंभीचे स्वरुप होते. हेच लेख पुढच्या काळात निबंध या नावाने समाजात आले. थोडक्यात प्रारंभीचे निबंध हे समाजाला उपदेश करणे या हेतूनेच लिहिलेले आपणास जाणवते.

१८१८ ते १८८५ या अव्वल इंग्रजी कालखंडात मराठी वाङ:मयात जे अनेकविध बदल घडून आले, त्यामध्ये मुद्रणकला अस्तित्वात आल्यानंतर त्यातूनच निर्माण झालेला वृत्तपत्र व्यवसाय तात्कालीन मरगळलेल्या लोकांच्या जीवनात नवचैतन्य निर्माण झाले. लोक जागृती, ज्ञानप्रसार, व करमणूकीचे एक प्रभावी साधन म्हणून वृत्तपत्र व नियतकालिकांचा महत्वाचा वाटा होता. आणि त्याच्या आश्रयाने मराठी वाङ:मयात मराठी निबंध वाङ:मयाचा परिपोष झाला. या नियतकालिकामध्ये आपणास निबंधाचे मुळ पहावयास मिळते. तेथेच निबंधाचा उदय झाला असावा.

सामाजिक जीवनात सुधारणा घडवून आणने हे तात्कालीन निबंध-कारांचे महत्वाचे प्रयोजन होते. त्यामुळे ज्ञानदान, समाजप्रबोधन, व सामाजिक, राजकीय जागृती ही या निबंधाची मूळ प्रेरणा होती. वैचारिक, गंभिर निबंध ही आजची गरज होती. निबंधातून समाज प्रबोधन करणे,हाच आदर्श आमच्या निबंधकारांच्या समोर चांगल्याप्रकारे होता. साहजिकच इंग्रजी वाङ:मयातील डॉ.जॉन्सन, बेकन, कार्लाईल, रास्किन, मेकॉलो या सारख्या श्रेष्ठ अभ्यासकांचे अनुकरण या निबंधकारांनी केले आहे. बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी, बाबा पद्मनजी यांनी सामाजिक, राजकीय, धार्मिक चालीरितीवर लेख लिहिले.व त्यातून समाज प्रबोधनाचे कार्य केले. हे वरील निबंधकारांच्या निबंध लेखनावरुन जाणवते.

UNIVERSITY * KOLHAPUR

(ई) निबंधमालापूर्व मराठी निबंध :

अव्वल इंग्रजी कालखंडात इंग्रजी सत्तेच्या बरोबर अनेक गोष्टी भारतात आल्या त्यामध्ये मुद्रणकला ही महत्वाची गोष्ट आली. त्यामुळे वृत्तपत्र, मासिके व साप्ताहीके यांच्या निर्मितीला महत्वाची चालना मिळाली. १८३२ मध्ये " दर्पण " तर १८४० मध्ये " प्रभाकर " १८४१ मध्ये " ज्ञानोदय " १८४९ मध्ये " ज्ञानप्रकाश " १८३२ मध्ये "इंदूप्रकाश" यासारखी वृत्तपत्रे व मासिके निर्माण झाली. या वृत्तपत्राने व मासिकाने या कालखंडात समाजप्रबोधनाचे महत्वाचे कार्य केले. " मराठी ज्ञानप्रसारक " या मासिकाने मराठी निबंध वाङ:मय निर्मितीस चांगलाच हातभार लावला. कृष्णशास्त्री चिपळूणकर, बाळशास्त्री जांभेकर, भाउ महाजन, लोकहितवादी, बाबा पदमनजी, मिसेस फरार या सारख्या निबंधकारांनी मराठी निबंधाचे प्राथमिक स्वरुप विशद केले आहे. माहिती, ज्ञानप्रसार, स्थळांचे वर्णन, प्रवास वर्णन, नीतीचा बोध, सामाजिक सुधारणा, धर्मविषयक विचार, व्यवहारिक उपदेश, यासारखे विषय तात्कालीन निबंधकारांनी निवडले. " स्वदेशी लोकामध्ये विलायतेतील विद्यांचा अभ्यास अधिक व्हावा आणि या देशाची समृध्दी व येथिल लोकांचे कल्यान या विषयी स्वतंत्र्यतेने व उघड रीतीने विचार करावयास स्थळ व्हावे, मनोरंजन करणे, चालते काळाचे वर्तमान कळविणे, आणि योग्य तेस येण्याचे मार्ग दाखविणे या गोष्टींची दर्पणकारास मोठी उत्कंठा आहे. म्हणून या गोष्टी साध्य होण्यासाठी जितका प्रयत्न करवेल तितका ते करतील "[११] हे दर्पणच्या पहिल्या अंकाच्या वेळी बाळशास्त्री जांभेकरांनी काढलेले उद्गार या निबंधाचे विषय निश्चित करुन जातात.

गोपाळ हरि देशमुख उर्फ लोकहितवादी यांनी " प्रभाकरा "च्या माध्यमातून आपली पत्रे प्रसिध्द केली. ती पत्रे निबंध वाङ:मयाच्या दृष्टिने

SARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

महत्वाची ठरली. समाजजागृती व ज्ञानप्रसार हाच त्यांच्या या लेखनामागील महत्वाचा हेतू होता. समाजजागृतीसाठी लोकहितवादींची दृष्टी नेहमीच भेदक रूप धारण करते. हे त्यांच्या प्रभाकरातील निबंधवजा लेखावरून समजते. वयाच्या बत्तीसाव्यावर्षी कोणाचीही तमा न बाळगता लोकहितवादींनी आपली मते लोकांच्या व राज्यकर्त्यांच्या समोर मांडली. समाजाची सर्व व्यंगे कोणाचीही तमा न बाळगता तिरवट भाषेचा वापर करून मांडली. त्यांची भाषा तिखट, बोचरी डौलदार व वाखाण्यासारखीच होती. " हिंदुस्थानच्या पराधिनतेची कारणे " "स्वदेशप्राप्ती", "इंग्रज सरकार" इ. विषयावरील लोकहितवादींचे लेखन निबंधाच्या बाळाचेच होते. "इंग्रजी विद्या", "अर्थशुन्य ब्राम्हण", "पांडित्याची योग्यता", पाठांतराची चाल," "देवळे", या विषयावरील त्यांचे लेखन लोकभक्षक असले तरी त्यातील कटूसत्य नाकारता येत नाही. "मद्यपान", निरुध्योगीवृत्ती, कुटुंबपध्दती इ. स्फुट विषयावरील लोकहितवादींची मते वाखानण्यासारखी आहेत. ब्राम्हणांच्या दांभिकतेवर त्यांनी कठोर टीका केली होती. विचार जागृती हे लोकहितवादींच्या लेखनाचे महत्वाचे अंग आहे. आपल्या शंभराव्या अंकात " लोकहितवादींनी कोणाची मजूरी पत्करली नाही, कशाची अपेक्षा, अशा किंवा इच्छा धरली नाही, कोणाच्या सांगण्यावरून किंवा शिकविण्यावरून कृत्रीम वर्णन केले नाही. लाभावर किंवा द्रव्यावर नजर ठेवून किर्ती व्हावी या हेतूने लिहिले नाही. इतके श्रम जे केले ते लोकास त्याची वास्तविक जी स्थिती आहे ती कळावी, त्यांनी सुधारावे, त्यास इहलोकी वृध्दी व्हावी परलोकाचे साधन घडावे व आपले बहुत काळापासून दृढ ग्रह झाले आहेत ते कमी व्हावे; किंवा नाहिसे व्हावे, इतक्याच हेतूने मी यथामतीने व स्वेच्छेने वेतना वाचून श्रम केले आहेत व जितके लिहिले आहे तितके अक्षरश: खरे खरे निवडून, विचार करून काळजीने लिहिले आहे."[१४] यावरून ~~किती=इतकी~~ लोक लोकहितवादींची सामाजिक सुधारणेची तळमळ किती होती याचा प्रत्येय येतो.

ही सुधारणा आपल्या पत्रात्मक स्वरुपाच्या लेखनातून त्यांनी पूर्ण केल्याचे जाणविते. त्यांची शतपत्रे याच स्वरुपाची होती.

१८६२ साली निबंधाचे प्राथमिक स्वरुप स्पष्ट करताना निबंधावरच एक निबंध लिहिला आहे. यावरुन निबंधाचे प्रारंभीचे स्वरुप कसे होते ते जाणविते. " कोणताही विषय न्याय रीतीने उद्घटणे, आणि त्याची यथाशक्ति जुळणी करुन जे वर्णन करणे तो निबंध होय."[१५] यावरुन तात्कालीन निबंधाच्या रचनेची,भाषेची, विचारप्रणालीची आणि एकंदर वाङ:मय प्रकाराची थोडीफार जाणीव होते. तथापि समाजप्रबोधन हेच महत्वाचे कार्य या पाठीमागे होते.

(ड) निबंधाचे प्रकार :

मराठी निबंधाचे प्राथमिक स्वरुप हे मुख्यत: उपदेश या संकल्पने भोवतीच फिरत होते. मिसेस फरार, रे वुइलसन या सारख्या कांही मिशनरी लोकांनी व भाउ महाजन, बाळशास्त्री जांभेकर यांच्यापासून लोकहितवादी पर्यंतच्या निबंधकारांनी आपल्या निबंधातून प्रकर्षाने उपदेशच केलेला दिसून येतो. " मद्यपान निषेधक बोध ", " सदाचार ", या सारख्या निबंधाच्या मथळ्यावरुनच या सर्व निबंधांचा आशय स्पष्ट होतो. प्रथम उपदेश करावयाचा, त्याला अनुसरुनच उदाहरणेही द्यावयाची व शेवटी कळत न कळत विनंती करावयाची असे या कालखंडातील निबंधाचे, उपदेशाचे स्वरुप असल्याचे आपल्या लक्षात येते.

१. ज्ञानप्रसारात्मक निबंध :

या स्वरुपाच्या निबंधानाच वैचारिक स्वरुपाचे निबंध असेही म्हटले जात होते. ज्ञानप्रसार आणि उपदेश हेच त्याचे स्वरुप असल्यामुळे लालित्यपूर्णता

हा भाग त्यांनी महत्वाचा नव्हता. रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, व्यापार, व राज्यविषयक निबंध, विष्णुशास्त्री चिपळूणकरांचा " वाचन ", डॉ. जॉन्सन, हे या स्वरुपाचे निबंध होते. प्रारंभी विषयाचा उहापोह, मध्यंतरी साधक-बाधक विवेचन, व शेवटी तात्वीक निश्चिती असा क्रम या काळातील निबंधाचा दिसून येतो.

२. मत प्रचारात्मक निबंध :

या आशयाच्या निबंधाना वृत्तपत्रीय निबंध असे म्हण्टले जात होते. कारण ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्यासाठी " ज्ञानोदय " हे वृत्तपत्र सूरु झाले. तर या वृत्तपत्रावर प्रहार करण्यासाठी " सत्यनिरुपण " व " दंभहारक " या नियतकालिकातून आपल्या मताचा प्रचार आणि दुस-याचे मत खंडन सुरु झाले. या निबंधाचे स्वरुप मर्यादीत काळापूरते असते. त्यामुळे रचना व मथळा अकर्षक असतो. निबंध वाड:मयात लेखकाच्या व्यक्तिमत्वाला स्थान वृत्तपत्रीय निबंधामुळेच मिळाले. कलात्मक सौंदर्याची जाणीव या निबंधामध्येच असते.

३. पत्ररुप निबंध :

या निबंधातील आशय उपदेशपर होता. निबंधकार पत्ररुपाने आपले विचार लोकापर्यंत पोहचवित असे. "प्रभाकर" या मासिकात लोकहितवादींनी शतपत्रे लिहिली. आगरकरांनी सुधारकातून "महाराष्ट्रीयांना अनावृत्त पत्र " लिहिले. पत्ररुप निबंध प्रकारात निबंधकार कोणत्याही विषयाचा आडपडदा अगर संकोच न बाळगता व्यक्तिगत जिव्हाळा वाचकांना दाखवून त्या वाचकांशी संधान बांधत असतो. एका अर्थाने अत्यंत सोप्या भाषेत वाचकांशी मारलेल्या त्या गप्पाच असतात. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास या निबंधाचे स्वरुप हे लघुनिबंधाचेच असते.

४· <u>व्यक्तिचित्रणात्मक निबंध</u> :

इंग्रजी वाङ्मयातील Character Essay यालाच मराठी-मध्ये व्यक्तिचित्रणात्मक निबंध ही संज्ञा वापरली जाते· निबंधकार वाचकांना अकर्षक वाटावे म्हणून काल्पनिक व्यक्तिंचे चित्रण करुन किंवा रंगवून त्याद्वारे आपले विषय रेखाटतो· इंग्रजी साहित्यातील अॅडिसनने सर रॉजर, डॉ·कावेर्ले या व्यक्तिरेखा अशाच काल्पनिक स्वरुपात रेखाटून नंतरच्या कालखंडात ही कल्पनेतील व्यक्तिरेखा रेखाटण्यापेक्षा प्रत्येक्ष सृष्टीतीलच व्यक्तिरेखा रेखाटू लागल्या· अलिकडच्या दहा वर्षात हा प्रकार चांगल्या स्वरुपात रेखाटला जाऊ लागल्या आहेत· निबंधकार ज्याप्रमाणे एखादा विषय रंगवितो त्या-प्रमाणेच व्यक्ती ही रंगवितो· व वाचकांच्या समोर मांडण्याचा प्रयत्न करतो·

निबंध वाङ्मयात आढळणारे निबंध सर्वसाधारणत: वरील प्रकारातच समाविष्ठ होताना दिसतात· प्रारंभी या निबंधाच्या मुळाशी लालित्याचा भाग नव्हता· परंतु नंतरच्या काळात जस जसा निबंध वाङ्मयाचा विकास होत गेला तस तसे निबंध वाङ्मयात लालित्य हा भाग येऊ लागला· जीवन विषयीचा म उपदेश करण्यासाठीच प्रारंभी निबंध हा वाङ्मयप्रकार अस्तित्वात आलेला आपणास दिसून येतो·

(ऊ) <u>नियतकालिक : एक महत्वाचे माध्यम</u> :

चिपळूणकरपूर्व निबंधाचा आढावा घेत असताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की, या काळात जे लेखन झाले ते समाजातील माणसापर्यंत पोहचविण्याचे महत्वपूर्ण कार्य नियतकालिके व वृत्तपत्रे यांनी केले· समाज जागृतीचे श्रेष्ठ माध्यम म्हणजे वृत्तपत्र व नियतकालिक होय असे लोकहितवादींना वाटते· कारण त्यातूनच लोकहितवादींनी आपले विचार समाजाच्या तळागाळापर्यंत पोहचविले· या विचारांची हिंदुस्थानात वृध्दी व्हावी असे त्यांना वाटत होते·

इंग्रजांच्या आगमनानंतर महाराष्ट्रात अनेक प्रकारचे बदल झाले. त्यामध्ये नियतकालिकांचा उदय ही एक महत्वाची घटना होय. "दर्पण" हे मराठीतील पहिले वृत्तपत्र १८३२ मध्ये अस्तित्वात आले. जांभेकरांनी ते सूरु केले. केवळ बातम्या समाजापर्यंत पोहचविणे एवढाच त्यांचा मर्यादीत हेतू नव्हता. बातम्या बरोबर ज्ञानप्रसार करणे हे त्या पाठीमागे महत्वाचे प्रयोजन होते. "दर्पण" प्रमाणेच "प्रभाकर" या वृत्तपत्रातील लेखनात भाऊ महाजन, यांचा वाटा महत्वाचा होता. तसेच १८४९ मध्ये " ज्ञानप्रसारक " हे मासिक प्रकाशित झाले. जोशी, दीक्षित यांचे निबंध याच मासिकातून प्रसिध्द झाले आहेत. हे निबंध विचार व अभिव्यक्ती या दृष्टिकोनातून उत्कृष्ठ ठरले आहेत. मराठी भाषा, महाराष्ट्र भाषेमध्ये व्याकरण, आपल्या देशाची स्थिती, या सारख्या निबंधातून चिपळूणकरपूर्व निबंधाचे स्वरुप कांही अंशी समजते.

याच कालखंडात १८१३ मध्ये अमेरिकन मराठी मिशनरिंची स्थापना झाली. या मिशनरी लोकांनी धर्मप्रसाराच्या स्वार्थी हेतूने अधिक सुधारणा ऐतदेशात केल्या. धर्मप्रसाराच्या भावनेने आपल्या ख्रिस्ती धर्माची लहान-लहान पुस्तके छापली व आमच्या लोकांना मोफत वाटली. परंतु या माध्यमातून ऐतदेशीय लोकांची वाचनाची आवड वाढली. १८३५ मध्ये मिसेस फरार या ख्रिस्ती मिशनरीने " कुटुंबप्रर्वतननीति " हा दीर्घ निबंध लिहिला. तो उल्लेखनिय ठरला. लोकांनी जागृत व्हावे, त्यांनी सन्मार्गाला लागावे, अशा प्रकारचे बोधपर निबंध या कालखंडात निर्माण झाले. या प्रारंभीच्या निबंधात कलात्मकता किंवा वाङ:मयीनता फारशी नव्हती. एक प्रकारे रांगडेपणा, ओबड-धोबडपणा होता. भाषा सफाईदार नव्हती, त्या पाठीमागे सुधारणेची उत्कट तळमळ होती. "व्यवसायापासून अलिप्त रहावे", आळस आणि कर्ज", "बाजारीपणा", या सारख्या निबंधावरुन त्याची प्रचीती येते.

मिसेस फरार, बाळशास्त्री जांभेकर, यांच्या प्रमाणेच लोकहितवादी यांनीही विपूलप्रमाणात निबंध लेखन केले. ते १८१८ ते १८७४ या कालखंडात तर गाजलेच पण आजही ते निबंध वाचनिय आहेत. अशा उत्कट स्वरुपाचे निबंधलेखन त्यांनी केले. हे निबंध "शतपत्रातून प्रसिध्द झाले. समाजाविषयी तळमळ, तिव्र आवेग, ही लोकहितवादींच्या लेखनाची प्रमुख वैशिष्टये सांगता येतील. सामाजिक दोषावर प्रखर टीका करताना " लोक मूर्ख झाले आहेत, त्यांना वळण लावले पाहिजे, व या अध:पतनाला सर्वस्व ब्राम्हणवर्ग जबाबदार असल्याने ब्राम्हण वर्गावर त्यांनी वेळोवेळी शब्दांचा, अपशब्दांचा भडिमार केला आहे. परंतु निबंध म्हणून लोकहितवादींनी विषयाचे सांगोपांग विवेचन, पूर्वनियोजन, विषयाच्या प्रतिपाद्यानुसार त्यांच्या मर्यादांचा विचार, समर्पक व नेटकी मांडणी या गोष्टी मात्र त्यांच्या निबंधात आढळत नाहीत. ही त्यांच्या लेखनाला पडलेली फार मोठी मर्यादाच म्हणावी लागेल. या निबंध वाङ:मयप्रकारात बाबा पद्मनजी यांनी केलेली कामगिरी उल्लेखनीय आहे. त्यांनी आपल्या लेखणीने शंभर पुस्तके लिहिली. त्यांच्या स्फुट निबंधाचा संग्रह " निबंधमाला " या नावाने प्रसिध्द झाला. त्याचा "स्त्रीविद्याभ्यास निबंध", "कुटुंबसुधारणा " असे दीर्घ स्वरुपाचे निबंध लेखन त्यांनी केले आहे. "भाषेची प्रौढी, पदरचनेची शैली, अन्वयाची एकता, विचाराचे गांभीर्य, व शब्दालंकार याची कलात्मक जाणीव बाबा पदमनजी यांच्या शिवाय अव्वल इंग्रजीतील निबंधात अपवादानेच आढळते."[१६]

चिपळूणकरपूर्व काळातील महत्वाचे निबंधकार म्हणून कृष्णशास्त्री चिपळूणकर, बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडूरंग, बाबा पद्मनजी, मिसेस फरार, का.बा.मराठे यांच्या जोडीनेच माडगावकर यांचाही समावेश होतो. त्यांनी जे निबंध लेखन केले त्यातील शीर्षीकामध्ये जो "बोध" हा शब्द आहे त्यावरुनच त्यांच्या लेखनाचा व निबंधाचा आशय आपल्याला जाणवितो. लोकांना ज्ञानद्यावे, सन्मार्गाला लावावे ही त्यांच्या लेखनाची प्रेरणा होती.

विषयाचा सांगोपांग अभ्यास, विषयाची मांडणी, यावरुन त्यांचा सुधारणावादी दृष्टिकोन परिचीत होतो.

चिपळूणकरपूर्व कालखंडात ग्रंथरुपाने निबंधलेखन करण्याचा लक्षणीय असा प्रयत्न " विष्णुबुवा ब्रम्हचारी", यांनी"वेदोक्ती धर्मप्रसार" हा ग्रंथ लिहून केला. सातशेहून अधिक पानाचा प्रदिर्घ निबंध लिहिण्याचा प्रयत्न मराठी वाङ:मयाच्या इतिहासात प्रथमच झाला. "सुखदायी राज्यप्रकरणी निबंध " हा ही त्यांच्या निबंध उत्कट झाला. या निबंधतात विष्णूबुवांनी साम्यवादी विचाराचा हिरिरीने पुरस्कार केला आहे. सृष्टी हे एक कुटुंब आहे. त्यातील शेती, माणसे ही सर्व एकाचीच आहेत. हा साम्यवादी विचार प्रस्तुत निबंधात त्यांनी मांडला, " सर्व प्रजा एक कुटुंब आहे." अशी कल्पना प्रस्तुत निबंधात विष्णुबुवा ब्रम्हचारी यांनी मांडला.

नियतकालिकातून प्रसिध्द झालेले निबंध, "दीर्घ निबंध", "स्फुट निबंध", अशा वेगवेगळया निबंधाचा आढावा घेतल्यास एक गोष्ट जाणविते की, लोकहितवादी, विष्णुबुवा ब्रम्हचारी या सारखे कांही अपवाद वगळले तर स्वतंत्र विचार व भाषाशैली असणारे लेखक या काळात आढळत नाहीत. म्हणूनच १९ व्या शतकातील एकूण वाङ:मय निर्मिती बद्दल पोतदार म्हणतात, " तारागण पुष्कळ उगवला पण तमोनाशक चंद्र मात्र कोठेच उगवला नाही " मात्र पुढे १८७४ मध्ये चिपळूणकरांची " निबंधमाला " सुरु झाली आणि निबंध वाङ:मयाला एक वेगळेच वळण लाभले.

(ए) <u>"मालापूर्व" नियतकालिकांचे कार्य</u> :

अव्वल इंग्रजी कालखंडात निबंधाचे महत्वाचे प्रयोजन सामाजिक जागृती, लोकशिक्षण, धर्मविषयक विचार, समाजाला देणे हे होते. हे कार्य नियतकालिके आणि वृत्तपत्र यांच्या माध्यमातून झाले. लोकहितवादींनी आपल्या "शतपत्रातून" जांभेकरांनी आपल्या " दर्पण " व " दिग्दर्शन " या

सारख्या नियतकालिकातून आपले विचार मांडण्याचा प्रयत्न केला. सामाजिक सुधारणेचा विचार समाजापर्यंत पोहचविण्याचा व त्यांना स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव, परतंत्र्याची चिड निर्माण करण्याचे कार्य या नियतकालिकांनी केले. हे कार्य पाहताना स्पष्टपणे जाणविणारी गोष्ट म्हणजे शतकानुशतके जाणविणारी आपली परमार्थप्रवण दृष्टी बाजूला सरुन ती इहलोकावर ठेवण्याचा प्रयत्न केला. आपण सुखी होण्यासाठी काय केले पाहिजे ? याची चिकित्सा सुरु झाली. नियतकालिकांनी जनतेला आधुनिक काळाकडे आणण्याचा जोमाने प्रयत्न केला. त्यांच्या या कार्याने शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, व वाङ:मयीन या चारही क्षेत्रात नवी बीजे रोवली. या चारही क्षेत्रात नियतकालिकांनी व वृत्तपत्रानी केलेले कार्य सांगता येईल.

१. <u>लोकशिक्षण</u> :

इंग्रज वाङ:मयाच्या व लोकांच्या सहवासाने व त्यांच्या संस्कृतीची ओळख झाल्यामुळे आपण भौतिक विषयाच्या ज्ञानात किती मागासलेलो आहे. याची जाणीव आपल्याकडील इंग्रजी विद्या शिकणा-या लोकांना झाली आणि आपण मिळविलेले ज्ञान स्वभाषेतून आपल्या अशिक्षित लोकांनी द्यावे. अशी आमच्या लोकांना तळमळ वाटू लागली. हे ज्ञानप्रसाराचे कार्य आपल्या नियतकालिकातून त्यांनी केले. यामध्ये बाबा पदमनजी, विष्णुबुवा ब्रम्हचारी, लोकहितवादी या सारख्या निबंधकारानी महत्वाची कामगिरी बजावली. यांच्या नियतकालिकांची केवळ शीर्षके जरी आपण पाहिली तरी ज्ञानार्पणाचा हेतू स्पष्ट होतो. उदा. ज्ञानोदय, ज्ञानसंग्रह, विविध ज्ञानविस्तार, अरुणोदय, ज्ञानप्रकाश, इंदूप्रकाश इत्यादी या सर्व नियतकालिकांच्याकडे दृष्टी टाकली तरी त्यांचा जन्म हा केवळ ज्ञानप्रसार करणे हाच होता हे लक्षात येते. परंतु आपल्याला आपल्या देशाच्याही भौतिक परिस्थितीचे ज्ञान नाही याची

जाणीव, या लोकांना झाली. व " ज्ञान हेच ब्रह्म " या जाणीवेने तात्कालीन समाजसुधारकांनी आपले लेखन केले.

२. धर्मविषयक विचार :

अशिक्षितपणामुळे तात्कालीन समाजमनावर अनेक धर्मभोळ्या कल्पनांचा पगडा बसला होता. या धर्मभोळेपणालाच आमचा समाज आपली संस्कृती मानीत होता. कर्मकांड, रुढी, यासारख्या धर्माच्या बाहयांगाला लोक धर्माचा आत्मा मानित होते आणि याच धर्मभोळेपणाचा फायदा घेऊन उच्चभ्रूलोक त्यांची पिळवणूक करत असत.

या दरम्यानच ख्रिस्ती धर्मप्रसारकांना तात्कालीन राज्यसत्तानी पाठींबा दिला. ऐतदेशीय लोकामध्ये धर्म वाढावा म्हणून त्यांनी ऐतदेशीय भाषेत नियतकालिके काढली. आपल्या धर्माचे महत्त्व पटवून देणारी छोटी-छोटी पुस्तके काढली व ती हिंदुना मोफत वाटली. आपल्या धर्मपुस्तकांची भाषांतरे करुन ख्रिस्ती धर्म वाढविण्याचा प्रयत्न केला.

भारतावर पूर्वी इस्लामी धर्माचे आक्रमण झाले होते. पण शास्त्रचर्चा या मार्गाने ते आले नव्हते. स्वदेशीयांच्या रुढीवर या ख्रिस्ती मिशन-यांनी हल्ला चढविला. पृथ्वी शेषावर स्थिर आहे, कृष्णाने गोपीशी क्रीडा केली. या सारख्या विधानावर ख्रिस्ती मिशन-यानी प्रखर टीका केली. त्यामुळे आमची धर्म भावना खिळखिळी होण्यास प्रारंभ झाला. पण याचाअटकाव करण्याचे काम प्रथम मोरभट दांडेकर यांनी प्रामुख्याने केले. दांडेकरांनी "उपदेश चंद्रीका" हे मासिक सूरु केले. त्यातील " शेषाद्री " प्रकरणामुळे मोठीच खळबळ माजली. आपल्या " उपदेश चंद्रिका " या मासिकाच्या प्रस्तावनेत श्री.दांडेकर म्हणतात, - " हिंदुलोक हो, तुम्हास माहित आहेच की, या देशात पाद्रींचा संचार होऊ लागल्यापासून आपले पवित्र धर्मास

धक्का येत चालला आहे. त्याही जागोजाग शाळा घालून व ख्रिस्ती धर्माची पुस्तके फुकट लोकास वाटून या लोकांना बाटविण्याचा महत-प्रयत्न चालविला आहे, व आपले लोकास आपले धर्माचे ज्ञान नसते. याजमुळे कित्येकास हिंदुधर्माचा कंटाळा येऊन ख्रिस्ती धर्म खरासा वाटू लागला आहे. तेंव्हा हे लोक हो, हा अनार्थ फार विस्तृत होण्याचेपूर्वी पत्प्रातिबंधार्थ कांहीतरी तजबीज या प्रसंगी योजने आवश्यक आहे की नाही ? माझे मते दरमहा एक पुस्तक काढून त्यास हिंदुधर्माची लोकास माहितगारी होई, व ख्रिस्ती लोक आपले धर्मावर दोष ठेवतात, त्याचे खंडन होई असे करावे. ही चांगली युक्ती आहे व पाद्री लोक दबले तर अशाने दबतील, त्यास हरवायास दुसरी युक्ती नाही." [१७]

वरील उद्गारावरून समाजातील हिंदुलोकांना स्वतः च्या अस्तित्वाची जाणीव तर त्यांनी करून दिलेली आहेच. पण यापेक्षाही ख्रिस्ती लोकांच्या विचारांचा व धर्मप्रसाराच्या स्वार्थीहेतूचा बिमोड करण्याचा प्रयत्न दांडेकरांनी केला आहे असेच म्हणावे लागेल.

## ३. सामाजिक सुधारणांचा पुरस्कार :

सामाजिक सुधारणा हा निबंधाचा व पर्यायाने नियतकालिकांचा महत्वाचा हेतू होता. ख्रिस्ती धर्मावर टीका करताना मिशनरींनी हिंदुधर्माच्या वैगुण्यावर जे बोट ठेवले होते. त्याकडे आपल्याकडील सुधारकाकडून मुळीच दुर्लक्ष झाले नाही. उलट त्यामुळे अंतर्मुख होवून ख्रिस्ती मशिन-यानी केलेल्या टीकेवर उत्तर देताना स्वतःचा धर्म सुधारणे हा ही एक उपदेश होता. बाळशास्त्री जांभेकर, भाउ महाजन, यांनी समाजसुधारणेचा हिरीरीने पुरस्कार केला. तर पुण्यामध्ये कृष्णशास्त्री चिपळूणकर, लोकहितवादी इ. साहाय्याने निघालेल्या " ज्ञानप्रकाश " या वृत्तपत्राचे प्रयोजन आणि नवशिक्षितांनी पुरस्कारलेला सुधारणावादी दृष्टीकोन महत्वाचा आहे. विष्णुशास्त्री पंडितांनी स्त्रीयावर होणा-या अन्यायावर, जुलमावर, आपल्या लेखनातून प्रखर हल्ला

चढविला. तो "ज्ञानप्रकाश" या वृत्तपत्रातून केला. ख्रिस्ती मिशन-यांनी हिंदुधर्मावर हल्ले चढविले. तेव्हा नव्या दृष्टिकोणातून धर्माचा विचार करावयास महाराष्ट्रात अनेक धर्म-पंथ उदयास आले व हा विचार समाजापर्यंत पोहचविण्याचे सर्वात महत्वाचे कार्य निबंध वाङ:मयाने केला.

४. देशाभिमान जागृती :

सामाजिक सुधारणेसाठी आपले मत समाजाला पटवून सांगण्याचे कार्य जसे नियतकालिकांनी केले तसे आपल्या हक्कासाठी परकीयाना आपले मत परखडपणे सांगण्याचे कार्य याच नियतकालिकांनी केले. देशाभिमानाच्या जाणीवेतून देशबांधवांची बाजू त्यांनी सरकारपुढे मांडली.

" प्रभाकर " या वृत्तपत्रातून इंग्रजी अधिका-यांच्या दोषावर प्रखर टीका केली आहे. इंग्रजी अधिका-यापासून गोरगरीब जनतेची कशी पिळवणूक होते. हे ही सांगण्याचा प्रयत्न केला. या पत्रातून जनतेची गरीबी आणि इंग्रज अधिका-यांनी त्यांची चालविलेली पिळवणूक याकडे लोकहितवादीनी लक्ष केंद्रीत केले. "हिंदुस्थानची गरीब दशा किती आहे ही ज्यास पाहणे आहे त्याने कोकणात आणि देशावर खेडयातून आणि गावातून फिरावे आणि लोकांची सध्याची खरी हकीकत पुसावी म्हणजे सजेल इंग्रजी अंमलदार हजारो रुपये पगार खाऊनही लक्षावधी रुपये लाच खातात."[१८]

५. पूर्ववैभवाची जाणीव :

प्राचीन वैभवाची ओळख करुन देण्याचे कार्य नियतकालिकांनी केले. इंग्रजी राज्यकर्ते, इंग्रजी पंडित, ख्रिस्ती मिशनरी या तीन्ही वर्गानी भारतीय संस्कृतीवर प्रखर टीका केली. भारताला अभिमान बाळगण्यासारखा पूर्व इतिहास नाही, त्यांचे पवित्र ग्रंथही उसणवारीच आहेत, त्यांना नीतीमुल्ये नाहीत, या सारख्या टीकेला उत्तर देण्यासाठी "ज्ञानप्रसारक"हे

महत्वाचे मासिक होते· यातील लेखातून मराठ्यांच्या इतिहासा बद्दल अनेक लेख आले आहेत· "शिवाजी महाराज यांचा वृत्तांत" वैदिक काळाचे भरत खंड" असे काही लेख आले आहेत· या लेखनाचा मुख्य हेतू म्हणजे जुण्या संस्कृत व मराठी वाड्:मयाकडे वाचकांचे लक्ष वेधने हाच होता·

नियतकालिकांनी शैक्षणिक व सामाजिक, राजकीय व वाड्:मयीन अशा चारही क्षेत्रात महत्वपूर्ण कामगिरी बजावली· एका अर्थाने मराठी माणसाच्या मनाची व वैचारिकतेची पायाभरणी करण्याचे काम या निबंध वाड्:मयाने केले· तर नियतकालिकांनी अवलंबलेल्या लोकशिक्षणाच्या जाणीवेने तात्कालीन समाज खडबडून जागा झाला व स्वत:च्या अस्मितेची जाणीव त्याला होऊ लागली· पारलौकीकाकडून अहिकतेकडे, दैववादाकडून बुध्दिवादाकडे त्यांने आपला मोहरा वळविला· १८७४ साली चिपळूणकरांची "निबंधमाला" आवतरली· तेंव्हा या मानसिक क्रांतीचे व विचारश्रेणीचे संचित त्यांच्या पाठीशी होते·

* निष्कर्ष :

निबंध या वाङ:मय प्रकाराचा उदय इंग्रजी राज्याच्या आगमना-नंतर झाला· त्या सुमारास अनेक निबंधकार आपले निबंध प्रकाशित करीत होते· या कार्यात ख्रिस्ती मिशनरी लोकांचा महत्वाचा भाग होता· रॉबर्ट निज्बिट यांचे " भगवतगीतेचे सार (१८३२) व ब्राम्हणांचे महत्व (१८३२) हे ग्रंथ निबंध सदृश्य आहेत· या पूर्वीमात्र निबंध हा वाङ:मय प्रकार नव्हता· १८३५ मध्ये मिसेस फरार यांनी "कुटुंबप्रवर्तननीति" हा निबंध लिहिला· येथूनच मराठीतील निबंध या वाङ:मयप्रकारास प्रारंभ झाला·

कोठूनही विषयाला सुरवात करावी, येईल तो मुद्दा लिहावा,

मुख्य विषयाला अनुसरून विषयाची मांडणी करावी, महत्वाच्या बाबींची पुनरुक्ती करावी, असे एकंदर या निबंधाचे स्वरुप होते. विषय निवडी-बाबतही फारशी कल्पकता नव्हती. कोणत्याही लहानमोठया विषयाचे भाषांतर केले जात होते. सखोल व स्वतंत्र चिंतन करून निबंध लिहिले जात नव्हते. लोकहितवादींचे निबंध याला अपवाद जरी असले तरी त्यामध्येही काही दोष ही होतेच. धार्मिक व सामाजिक विषयाबरोबर राजकीय विषयावरही लेखन केले जात असे. अव्वल इंग्रजीतील निबंध वाङ्:मयाचे विभाजन केले तर त्यांचे दोन कालखंड जाणवतात. १८३२ ते १८४९ हा पहिला व १८५० ते १८७४ हा दुसरा भाग १८३२ मध्ये " दर्पण " पत्र सुरु झाले. त्यामध्ये स्फुट लेखनाला वाव मिळाला. " प्रभाकर " पत्राने निबंध विषयक महत्वाचे कार्य केले. लोकहितवादींची " शतपत्रे " प्रभाकरा-तूनच प्रसिध्द झाली. त्यामध्ये चिंतनशीलता दिसते. या निबंध वाङ्:मयात दोन प्रवाह दिसतात. नियतकालिकात प्रसिध्द होणारा स्फूट निबंध आणि ग्रंथरुपाने निर्माण झालेला दीर्घ निबंध असे दोन प्रवाह या कालखंडात मराठी वाङ्:मयात दिसतात.

१८१८ मध्ये पुढे ज्ञानप्रसारक मासिक निघाले.आणि इंग्रजी वाङ्:मयाचा पूर्वार्ध संपून उत्तरार्धाला सुरवात झाली. याच काळात अनेक वृत्तपत्रे, मासिके, ग्रंथप्रकाशन संस्था, सरकारी संस्था, यांनी समाजजागृतीचे कार्य केले होते. दादोबांच्या व्यकरणाची सुधारलेली आवृत्तीही याच सुमारास बाहेर पडली होती. या सर्व गोष्टींचा परिणाम पुढील वाङ:मया-वर झालेला दिसतो. एत देशीय लेखकांची संभ्रमावस्था संपून त्यांनी स्वत:ची वैचारिक भूमिका स्वीकारली. इंग्रजीची वैयक्तिक आणि सामाजनीती व शिस्त आत्मसात करावयास पाहिजे असे वाटून गो.ना.माडगावकर, वि.ना.मंडलीक यांनी ख्रिस्ती निबंधकारांच्या धर्तीवर भाषांतरवजा उपदेशपर निबंध लिहिले. माडगावकरांनी सुबोधशैली कमावली. पण त्यांच्या निबंधाचा आशय "शालेय"

अवस्थेच्या पलीकडे जाऊ शकला नाही. निबंध हा स्वतंत्र वाङ:मयप्रकार आहे याची जाणीव त्यांना नव्हती. दादोबा पांडूरंग, का.बा. मराठे, कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्यात ती थोड्याफार प्रमाणात होती. पण त्यांनी निबंध लेखन फार थोडे केले. यामुळे अशी वाङ:मयीन जाण आपल्याकडच्या लोकांच्या ठिकाणी नव्हतीच. ती इंग्रजीतून नुकतीच येऊ लागली होती. असे म्हणता येईल. मात्र या निबंधकारांनी मौलिक विचार, आक्रमकवृत्ती, शैलीचे कसब ही सारी वैशिष्टये स्वतंत्र रितीने आपापल्या निबंधात लेखकांना उपयोगी पडली. निबंधाची ही वैशिष्टये पुढे विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधात प्रकर्षाने दिसतात. या काळातील निबंधाचे वाङ्:मयीन कार्य महत्वाचे आहे. पुढील निबंधाची जडण-घडण ती याच कालखंडात झाली असे म्हणता येईल.

=0=0=0=0=0=0=

# संदर्भ - सूची


| | | | |
|---|---|---|---|
| (१) | तुळपुळे शं·गो· (संपादक) | : | "मराठी निबंधाची वाटचाल"<br>विदर्भ मराठी बुक कंपनी,<br>पहिली आवृत्ती, १९६८<br>पृष्ठ क्र·७ |
| (२) | तत्रैव | : | पृष्ठ क्र·५ |
| (३) | फाटक म·वि· | : | "मराठी निबंध"<br>महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई<br>पहिली आवृत्ती, १९५०<br>पृष्ठ क्र·२५ |
| (४) | तत्रैव | : | पृष्ठ क्र·२५ |
| (५) | तत्रैव | : | पृष्ठ क्र·२५ |
| (६) | तत्रैव | : | पृष्ठ क्र·२५ |
| (७) | तत्रैव | : | पृष्ठ क्र·२७ |
| (८) | तत्रैव | : | पृष्ठ क्र·२७ |
| (९) | तत्रैव | : | पृष्ठ क्र·३२ |
| (१०) | देशपांडे सुधाकर | : | "माला"कार चिपळूणकर"<br>मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई<br>पहिली आवृत्ती, १९८५<br>पृष्ठ क्र·३० |

| | | |
|---|---|---|
| (११) देऊळगावकर वि॰प व चंद्रकांत | : | "मराठी निबंध-लघुनिबंध स्वरूप व विवेचन" मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे दुसरी आवृत्ती, पृष्ठ क्र॰६ |
| (१२) तत्रैव | : | पृष्ठ क्र॰७ |
| (१३) जोग रा॰श्री॰(संपादक) | : | "मराठी वाङ:मयाचा इतिहास" महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे॰ दुसरी आवृत्ती, १९७३ पृष्ठ क्र॰६३ |
| (१४) तत्रैव | : | पृष्ठ क्र॰८० |
| (१५) तत्रैव | : | पृष्ठ क्र॰८२ |
| (१६) देशपांडे सुधाकर | : | "माला"कार चिपळूणकर" "उनि" पृष्ठ क्र॰३३ |
| (१७) तत्रैव | : | पृष्ठ क्र॰११ - १२॰ |
| (१८) तत्रैव | : | पृष्ठ क्र॰१३ - १४॰ |

=0=0=0=0=0=